Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

# MPSC
# ASO
## Previous Year Paper
### Paper-II 10 Dec, 2022

Teachingninja.in

सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०२२

**A** → संच क्रमांक

2022 परीक्षा दि. १० डिसेंबर, २०२२ **P16**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO. 200581

प्रश्नपुस्तिका
पेपर II

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग/मंत्रालय येथे चालणाऱ्या**
**कार्यालयीन कामकाजाचे ज्ञान व पद्धती**

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा–क्रमांक

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **मंत्रालयातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग "अ" आणि विभाग "ब" सोडविणे आवश्यक आहे. आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग "अ" आणि विभाग "क" सोडविणे आवश्यक आहे.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम–82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

Teachingninja.in

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

Teachingninja.in

## विभाग "अ"

1. योग्य जोड्या जुळवा :

| I तरतुदी | | II अनुच्छेद | |
|---|---|---|---|
| (अ) | कायद्यापुढे समानता | (i) | अनुच्छेद - 19 |
| (ब) | सर्वत्र मुक्तपणे संचार | (ii) | अनुच्छेद - 18 |
| (क) | कारखाने इ. मध्ये बालकांना कामावर ठेवण्यास मनाई | (iii) | अनुच्छेद - 14 |
| (ड) | किताब नष्ट करणे | (iv) | अनुच्छेद - 24 |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (4) | (i) | (iv) | (iii) | (ii) |

2. जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण करण्याची तरतूद संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदात करण्यात आली आहे?

(1) अनुच्छेद 20 (2) अनुच्छेद 21 (3) अनुच्छेद 22 (4) अनुच्छेद 23

3. राज्यघटनेमध्ये मूलभूत कर्तव्यांचा समावेश कोणत्या घटनादुरुस्तीन्वये करण्यात आला?

(1) 41 वी घटनादुरुस्ती (2) 42 वी घटनादुरुस्ती (3) 43 वी घटनादुरुस्ती (4) 44 वी घटनादुरुस्ती

4. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन करण्यासाठी राज्य प्रयत्न करेल ही तरतूद संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदामध्ये आहे?

(1) अनुच्छेद 41 (2) अनुच्छेद 45 (3) अनुच्छेद 50 (4) अनुच्छेद 51

5. घटनेच्या कोणत्या अनुच्छेदानुसार अस्पृश्यतेची प्रथा रद्द करण्यात आली आहे?

(1) अनुच्छेद 17 (2) अनुच्छेद 18 (3) अनुच्छेद 35 (4) अनुच्छेद 25



Teachingninja.in

6. एखाद्या व्यक्तीने अपराध करतेवेळी अस्तित्वात असलेल्या शिक्षेच्या तरतुदी अपराध सिध्द होताना बदलल्या असतील तर त्याला कोणत्या तरतुदीनुसार शिक्षा देणे योग्य आहे ?

(1) अपराध करतेवेळी अस्तित्वात असलेल्या तरतुदीनुसार

(2) अपराध सिध्द होताना अस्तित्वात असलेल्या तरतुदीनुसार

(3) दोन्ही तरतुदीतील सुवर्णमध्य साधुन

(4) वरीलपैकी नाही

---

7. खालीलपैकी कोणते मूलभूत कर्तव्य **नाही** ?

(1) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे

(2) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन

(3) दुकाने, सार्वजनिक उपाहारगृहामध्ये प्रवेशास भेदभाव न करणे

(4) भारताची एकता व एकात्मता उन्नत ठेवणे

---

8. खालीलपैकी मूलभूत कर्तव्ये कोणती ?

(अ) संविधानाचे पालन करणे.

(ब) देशाचे संरक्षण करणे.

(क) हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

(ड) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन करणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) व (ड) (2) (अ), (क) व (ड)

(3) (ब), (क) व (ड) (4) (अ), (ब) व (क)

---

9. भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा हक्क भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदान्वये प्रदान करण्यात आला आहे ?

(1) 16 (2) 17 (3) 18 (4) 19

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

10. भारताच्या संविधानानुसार :

(अ) सर्व नागरिकांना भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा अधिकार आहे.

(ब) सदर हक्काच्या वापरावर राज्याची सुरक्षितता, परकीय देशांशी मैत्रीचे संबंध, सार्वजनिक सुव्यवस्था इ. हितासाठी राज्याला निर्बंध घालण्यासाठी कायदा करता येईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही विधाने बरोबर आहेत.
(2) विधान (अ) बरोबर असून विधान (ब) चुकीचे आहे.
(3) दोन्ही विधाने चुकीचे आहेत.
(4) विधान (ब) बरोबर असून विधान (अ) चुकीचे आहे.

---

11. भारतीय राज्यघटनेच्या भाग – IV मध्ये देण्यात आलेली निदेशक तत्वे कोणत्या न्यायालयाद्वारे अंमलात आणता येतात ?

(1) सर्वोच्च न्यायालय
(2) उच्च न्यायालय
(3) सत्र न्यायालय
(4) यापैकी कोणतेही नाही

---

12. "शोषणाच्या विरोधात" च्या संदर्भात खालीलपैकी कोणते **बरोबर** आहे ?

(1) मानवी वाहतुकीवर प्रतिबंध आणि सक्तीचे श्रम
(2) अल्पसंख्याकांच्या हिताचे संरक्षण
(3) अस्पृश्यता निर्मूलन
(4) कायद्यापुढे समानता

---

13. संविधान (शहाऐंशीवी सुधारणा) अधिनियम, 2002 अन्वये भारताचे संविधानाच्या कोणत्या भागात सुधारणा करण्यात आली ?

(अ) मूलभूत हक्क

(ब) राज्य धोरणाची निदेशक तत्वे

(क) मूलभूत कर्तव्ये

(1) फक्त (अ)
(2) फक्त (अ) व (ब)
(3) फक्त (अ) व (क)
(4) (अ), (ब) व (क)

---

14. माता-पित्याने किंवा पालकाने सहा ते चौदा वर्षांदरम्यानचे आपले अपत्य किंवा यथास्थिती पाल्य याला शिक्षणाच्या संधी देणे हे मूलभूत कर्तव्य कोणत्या अधिनियमान्वये संविधानात समाविष्ट केले आहे ?

(1) संविधान (बेचाळीसावी सुधारणा) अधिनियम, 1976
(2) संविधान (सेहेचाळीसावी सुधारणा) अधिनियम, 1976
(3) संविधान (शहाऐंशीवी सुधारणा) अधिनियम, 2002
(4) संविधान (अठ्ठ्याऐंशीवी सुधारणा) अधिनियम, 2002

---



Teachingninja.in

15. भारतीय राज्यघटनेने भारतीय नागरिकांना किती स्वातंत्र्याचा हक्क दिले आहेत?

(1) 5 (2) 7 (3) 6 (4) 5 व 7

---

16. पुढीलपैकी **योग्य** विधाने कोणती?

(अ) राज्यधोरणाची निदेशक तत्वे ही देशाच्या शासन व्यवहाराच्या दृष्टीने मूलभूत आहेत.

(ब) कायदे करताना राज्यधोरणाची निदेशक तत्वे लागू करणे हे राज्याचे कर्तव्य आहे.

(क) राज्यधोरणाची निदेशक तत्वे ही न्यायालयाकरवी अंमलबजावणी योग्य आहेत.

(1) फक्त (अ) व (ब) (2) फक्त (ब) व (क)

(3) फक्त (अ) व (क) (4) (अ), (ब) व (क)

---

17. 'कल्याणकारी राज्य' ही संकल्पना राज्यघटनेच्या कोणत्या भागात समाविष्ट आहे?

(1) मूलभूत कर्तव्ये (2) राज्यधोरणाचे निदेशक तत्वे

(3) मूलभूत अधिकार (4) संविधानाची प्रस्तावना

---

18. मानवतावाद, शोधकबुध्दी आणि विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन व सुधारणावाद यांचा विकास करणे हे काय आहे?

(1) मूलभूत हक्क (2) राज्यधोरणांची निदेशक तत्वे

(3) वैज्ञानिक विकास (4) मूलभूत कर्तव्ये

---

19. विवशित प्रकरणी अटक व स्थानबद्धता यांपासून संरक्षण या तरतुदीअंतर्गत अटक केलेल्या व्यक्तीस प्रवासाचा कालावधी वगळून किती कालावधीत दंडाधिकाऱ्यांपुढे हजर करणे आवश्यक आहे?

(1) 24 तासांच्या कालावधीत (2) 48 तासांच्या कालावधीत

(3) एका आठवड्याच्या कालावधीत (4) एक महीन्याच्या कालावधीत

---

20. राज्य विशेषत: गाई, इतर दुभती जनावरे व जुंपणीची गुरे यांच्या सोबतच खालीलपैकी कोणाचे जातीचे जतन करणे व त्या सुधारणे आणि त्यांच्या कत्तलांस मनाई करणे याकरिता उपाययोजना करील?

(1) शेळ्या (2) वासरे (3) शेळ्या व मेंढ्या (4) मेंढ्या

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**21.** जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| (अ) पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन | (i) अनुच्छेद - 44 |
| (ब) एकरूप नागरी संहिता | (ii) अनुच्छेद - 39-घ |
| (क) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन | (iii) अनुच्छेद - 48-क |
| (ड) स्त्री-पुरुषांना समान काम समान वेतन | (iv) अनुच्छेद - 51-क |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (2) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (3) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (4) | (i) | (iii) | (ii) | (iv) |

---

**22.** खालीलपैकी कशाचा समावेश मूलभूत कर्तव्यांमध्ये होत **नाही** ?

(1) राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.

(2) आधुनिक व शास्त्रीय रितीने कृषि व पशुसंवर्धनासाठी व्यवस्था करणे.

(3) स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.

(4) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद व सुधारणावाद यांचा विकास करणे.

---

**23.** खालील विधाने विचारात घेऊन **योग्य** पर्याय निवडा.

(अ) पूर्णतः राज्याच्या पैशातून चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही.

(ब) राज्याने मान्यता दिलेल्या किंवा राज्याच्या पैशातून सहाय्य मिळत असणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत धार्मिक शिक्षण दिले जाईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर (2) दोन्ही बरोबर (3) फक्त (ब) बरोबर (4) दोन्ही चूक

---



Teachingninja.in

24. संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदामध्ये चौदा वर्ष वयाखालील कोणत्याही बालकास कोणत्याही कारखान्यात व खाणीत काम करण्यासाठी प्रतिबंध करण्यात आला आहे?

(1) अनुच्छेद 22 (2) अनुच्छेद 23 (3) अनुच्छेद 24 (4) अनुच्छेद 25

---

25. श्रीयुत 'क्ष' यांना धार्मिक भेदाच्या कारणास्तव उपाहारगृहात प्रवेश नाकारण्यात आला. त्यामुळे भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदाचा भंग झाला?

(1) अनुच्छेद 13 (2) अनुच्छेद 14 (3) अनुच्छेद 15 (4) अनुच्छेद 16

---

26. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या कोणत्या नियमामध्ये जवळच्या नातेवाईकाची कंपन्यामध्ये किंवा भागीदारी संस्थामध्ये नियुक्ती करणे संदर्भातील तरतूद आहे?

(1) नियम - 3 (2) नियम - 4 (3) नियम - 7 (4) नियम - 12

---

27. विधाने लक्षात घ्या.

(अ) शासकीय कर्मचारी स्वत:च्या मालकीचे कोणतेही वृत्तपत्र चालवू शकणार नाही.

(ब) शासनास शासकीय कर्मचाऱ्याला अराजकीय स्वरूपाच्या बाबी समाविष्ट असतात असे वृत्तपत्र चालविण्यास परवानगी देता येईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) बरोबर (ब) चुकीचे (2) (अ) चुकीचे (ब) बरोबर

(3) दोन्ही विधाने बरोबर आहेत (4) दोन्ही विधाने चुकीचे आहेत

---

28. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 चे नियम 27 अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांना कशाकरिता प्रतिबंध करण्यात आला आहे?

(1) वर्गणी घेण्याकरिता (2) देणग्या देण्याकरिता

(3) हुंडा घेण्याकरिता (4) लवाद म्हणून काम करण्याकरिता

---

29. "सार्वजनिक ठिकाण " म्हणजे ________

(अ) ज्या ठिकाणी पैसे देऊन प्रवेश करण्यास जनतेला परवानगी असते.

(ब) ज्या ठिकाणी जनतेला प्रवेश करण्यास परवानगी दिली जाते.

(क) जनतेला वाहना सहित प्रवेश करण्यास परवानगी दिलेले कोणतेही ठिकाण.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) व (ब) (2) फक्त (अ) व (क)

(3) फक्त (ब) व (क) (4) वरील सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

30. म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 नुसार कोणते पर्याय **अचूक** आहेत?

(अ) शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या नोकरीशी संबंधित बाबीसंदर्भात संपाचा अवलंब करता येणार नाही.

(ब) परंतु प्रचलित कायद्यान्वये असा संप करण्यास परवानगी दिली असेल तर त्याला संपात भाग घेता येईल.

(1) पर्याय (अ) (2) पर्याय (ब) (3) पर्याय (अ) व (ब) (4) कोणताही नाही

---

31. एका शासकीय औद्योगिकेतर कर्मचाऱ्यांच्या संघटनेला मान्यता दिल्यानंतर त्याच वर्गाच्या अन्य संघटनेने अधिक सदस्य असल्याचा दावा केल्यास व मान्यतेसाठी अर्ज केल्यास पूर्वी मान्यता दिलेल्या संघटनेऐवजी नवीन संघटनेस मान्यता देण्याचा किमान कालावधी :

(1) आधीच्या संघटनेला मान्यता दिल्यानंतर 6 महिन्यानंतर

(2) आधीच्या संघटनेला मान्यता दिल्यानंतर 1 वर्षा नंतर

(3) आधीच्या संघटनेला मान्यता दिल्यानंतर 2 वर्षा नंतर

(4) वरीलपैकी नाही

---

32. खालीलपैकी कोणती बाब म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 मधील तरतुदीस अनुसरून आहे?

(1) मागासवर्गीय शासकीय कर्मचारी याने त्याच्या शासकीय सेवेसंबंधी बाबीच्या संबंधात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या प्रभारी मंत्र्याकडे अभिवेदन केले.

(2) शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या गावातील ग्रंथालयास शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय स्वत:चे नाव दिले.

(3) शासकीय कर्मचाऱ्याने जातीय द्वेष पसरविणाऱ्या संघटनेचे सदस्यत्व स्वीकारले.

(4) शासकीय कर्मचाऱ्याने कार्यालयीन बदलीसाठी विधानसभा सदस्यांचे पत्र कार्यालयात सादर केले.

---

33. म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 नुसार खालीलपैकी कोणती विधाने **योग्य** आहेत?

(अ) शासनाच्या पूर्वमान्यतेने गट 'अ' च्या अधिकाऱ्याने शासनाशी कार्यालयीन व्यवहार करणाऱ्या कंपनीत त्याच्या मुलाला नोकरी स्विकारण्यास परवानगी दिली.

(ब) 'अ' या कर्मचाऱ्याने वरिष्ठांच्या मौखिक निदेशानुसार संदर्भावर कार्यवाही केली. आता सदर मौखिक निदेशावर लेखी पृष्टीची आवश्यकता नाही.

(क) महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, 1967 अन्वये पोलीस पाटील म्हणून नियुक्त व्यक्तींना म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 मधील नियम 4, 7, 8, 9, 10, 12, 13, 14 हे लागू होतील.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) (अ) व (ब) (3) फक्त (क) (4) सर्व विधाने

---



Teachingninja.in

34. खालीलपैकी कोणते विधान **योग्य** आहे ?

(अ) कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या कुटुंबियाला कोणत्याही कंपनीत किंवा भागीदारी संस्थेत नियुक्ती मिळविणेसाठी स्वत:च्या पदाचा वापर करू नये.

(ब) गट – अ किंवा गट – ब च्या अधिकाऱ्याला त्याच्या कुटुंबियाने कोणत्याही कंपनीत किंवा भागीदारी संस्थेत नोकरी स्विकारली आहे हि माहिती मिळताच शासनाला नोकरी स्विकारलेबद्दल कळविले पाहिजे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब) (3) (अ) व (ब) (4) यापैकी एकही नाही

---

35. खालीलपैकी कोणते विधान **योग्य** आहे ?

(1) शासकीय कर्मचारी, कर्मचाऱ्यांसाठी नोंदणीकृत सहकारी बँकेच्या व्यवस्थापन समितीच्या निवडणूकीत भाग घेऊ शकतो.

(2) शासकीय कर्मचाऱ्यास तो निवृत्त झाल्यानंतर लगेचच वाणिज्यिक नोकरी स्विकारण्यासाठी शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

(3) 'ब' या शासकीय कर्मचाऱ्याची पत्नी विमा एजन्सीची मालक आहे. सदर बाब शासनास कळविण्याची आवश्यकता नाही.

(4) 'अ' या शासकीय कर्मचाऱ्याचा मुलगा विमा एजन्सीमध्ये कार्यरत असून 'अ' हे सदर विमा एजन्सीचा आपल्या कार्यालयात प्रचार करू शकतात.

---

36. म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 मधील नियम 5 पोटकलम (4) च्या तरतुदी गट क व गट ड च्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कोणास शिथिल करता येतील ?

(अ) विभागप्रमुख (ब) कार्यालय प्रमुख (क) वरिष्ठ अधिकारी (ड) आस्थापना अधिकारी

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) (2) (ब) व (ड) (3) (अ) (4) (क)

---

37. 'कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याने महिला कर्मचाऱ्याला कामामध्ये विशेष वागणूक देण्याचे गर्भित किंवा स्पष्ट आश्वासन देणे' हा कोणता छळवाद मानला जातो ?

(1) मानसिक छळवाद (2) लैंगिक छळवाद

(3) मानसिक व लैंगिक छळवाद (4) कामाच्या ठिकाणचा छळवाद

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

38. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 मधील नियमांच्या तरतुदींचा अर्थ लावण्याचा अंतिम निर्णय __________चा असेल.

(1) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (2) उच्च न्यायालय

(3) केंद्र शासन (4) महाराष्ट्र शासन

---

39. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 नुसार कोणत्या मुलांना शासकीय कर्मचाऱ्याने कामावर ठेवण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे?

(1) 18 वर्षाखालील (2) 14 वर्षाखालील (3) 17 वर्षाखालील (4) 16 वर्षाखालील

---

40. खालीलपैकी कोणती कृती ही म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 मधील नियमांचा भंग करणारी आहे?

(अ) 'क्ष' हे तलाठी पदावर कार्यरत असून त्यांनी त्यांच्या नोकरीच्या ठिकाणी जमीन विकत घेतली.

(ब) 'ब' हे ज्या जिल्ह्यात नोकरीला आहेत तेथे त्यांची वारसाहक्काने मिळालेली शेतजमीन असून त्याबाबत शासनाला कळविलेले आहे.

(क) 'क्ष' या शासकीय कर्मचाऱ्याने श्रीलंकेचे नागरिकत्व असणाऱ्या व्यक्तीशी विवाह केला असून त्याबाबत शासनाला कळविलेले आहे.

(1) (अ) (2) (ब) (3) (क) (4) वरील सर्व

---

41. शासकीय कर्मचाऱ्याच्या कर्तव्यासंदर्भात खालील कोणते विधान/ने **बरोबर** आहे/त?

(अ) नितांत सचोटी राखेल

(ब) कर्तव्यपारायणता ठेवेल

(क) सार्वजनिक साधनसंपत्तीचा काटकसरीने वापर करील

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (ब) (2) (ब) व (क) (3) (अ), (ब) व (क) (4) यापैकी एकही नाही

---

42. श्री "क्ष" लिपिक, मंत्रालय यांनी राजकारणातील चालू घडामोडीबाबत साप्ताहिक "पुढारपण" हा अंक सुरू केला.

(1) ही कृती म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 मधील कोणत्याही नियमाचा भंग करणारी नाही.

(2) ही कृती म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 मधील नियम 11 चा भंग करणारी आहे.

(3) कार्योत्तर मान्यता घेता येईल.

(4) ही कृती म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 मधील नियम 9 चा भंग करणारी आहे.

---



Teachingninja.in

43. 'जंगम मालमत्ता' ह्या संज्ञेमध्ये खालील कोणत्या मालमत्तेचा समावेश होतो ?

(1) जडजवाहिर, शेअर, रोखे आणि ऋणपत्रे

(2) मोटारगाड्या, मोटार-सायकली, घोडे किंवा कोणत्याही प्रकारचे वाहन

(3) रेफ्रिजरेटर, रेडिओ, रेडिओग्राम व टेलीविजन सेट

(4) वरीलपैकी सर्व

---

44. म.ना.से. (वर्तणूक) नियमांमध्ये 'शासन' ह्या व्याख्येनुसार खालील कोणते शासन अपेक्षित आहे ?

(1) राज्यशासन (2) केंद्रशासन

(3) राज्यशासन व केंद्रशासन (4) महाराष्ट्र शासन

---

45. म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 नुसार :

(अ) गट 'अ' चा कर्मचारी रू. 25,000 पर्यंत किंमतीच्या भेटवस्तू त्याच्या विवाहप्रसंगी त्याच्या नातेवाईकाकडून स्वीकारू शकेल. याबाबत शासनास कळविण्याची आवश्यकता नाही.

(ब) गट 'क' चा कर्मचारी रू. 7,500 पर्यंत किंमतीच्या भेटवस्तू खाजगी मित्रांकडून स्वीकारू शकेल. याबाबत शासनास कळविण्याची आवश्यकता नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर (2) फक्त (ब) बरोबर (3) (अ) व (ब) बरोबर (4) (अ) व (ब) चूक

---

46. शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनेला म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 मधील तरतुदीनुसार कोणते प्राधिकारी मान्यता देऊ शकतात ?

(1) उच्च न्यायालय (2) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण

(3) महाराष्ट्र शासन (4) वरीलपैकी सर्व

---

47. खालीलपैकी कोणती कृती म.ना.से. (वर्तणूक) नियमातील तरतुदीस अनुसरून नाही ?

(1) शासकीय कर्मचाऱ्याने मित्राकडून बिनव्याजी उसने पैसे घेतले.

(2) शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्याकडे काम करणाऱ्या नोकराला आगाऊ वेतन दिले.

(3) शासकीय कर्मचाऱ्याने नातेवाईकाला दवाखान्यात जाण्यासाठी पैसे दिले.

(4) शासकीय कर्मचाऱ्याने कार्यालयीन कामकाजासंबंधित व्यक्तीकडून व्याजाने पैसे घेतले.

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

48. शासकीय औद्योगिकेतर कर्मचाऱ्यांच्या संघटनेच्या सर्वसाधारण सभेच्या गणपूर्तीसाठी किती सदस्यांची उपस्थिती आवश्यक आहे?

(1) 1/3 सदस्य (2) 1/2 सदस्य (3) 1/4 सदस्य (4) 2/3 सदस्य

---

49. शासकीय कर्मचाऱ्यांचे (औद्योगिकेतर) प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनेने संघटना नियमांमध्ये सुधारणा करण्यासंबंधीचे प्रस्ताव ज्या बैठकीत प्रस्तावावर विचार व्हावयाचा असेल त्या बैठकीपूर्वी किती दिवस अगोदर शासनाला कळविले पाहिजेत?

(1) एक महिना अगोदर (2) दोन महिने अगोदर

(3) तीन महिने अगोदर (4) चार महिने अगोदर

---

50. शासकीय कर्मचाऱ्याच्या संबंधात 'कुटुंबीय' यामध्ये कोणाचा समावेश होत नाही?

(1) शासकीय कर्मचाऱ्याची पत्नी किंवा पती

(2) शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबून असणारा सावत्र मुलगा

(3) शासकीय कर्मचाऱ्याकडून ज्याची अभिरक्षा काढून घेण्यात आली आहे असा मुलगा

(4) शासकीय कर्मचाऱ्याच्या पतीशी/पत्नीशी रक्ताच्या नात्याने संबंधित असलेली आणि शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबून असणारी व्यक्ती

---

51. ज्या शासकीय कर्मचाऱ्याला भारताच्या किंवा राज्याच्या एकत्रित निधीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही उत्पन्नाच्या साधनातून शासन मंजुरीने वेतन मिळते त्या सेवेला काय म्हणतात?

(1) राजपत्रित सेवा (2) अराजपत्रित सेवा (3) स्वीयेत्तर सेवा (4) निवृत्ती वेतनार्ह सेवा

---

52. कोणकोणत्या नोंदीची सेवापुस्तकात नोंद घेतेवेळी कारणे नमूद करणे आवश्यक आहे?

(1) पदावनती, सेवेतुन काढून टाकणे (2) जन्मतारीखेची नोंद

(3) वैद्यकीय प्रमाणपत्राची नोंद (4) अन्य नोंदी

---



Teachingninja.in

53. स्थायी पद कायमपणे धारण करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याचा त्या पदावरील धारणाधिकार इतर नियमानुसार निलंबित/बदली केला नसेल तर खालीलपैकी कोणत्या परिस्थितीत अबाधित राहतो ?

(अ) स्वीयेत्तर सेवेत असताना

(ब) पदग्रहण अवधीमध्ये

(क) निलंबनाधिन असताना

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) फक्त (अ) व (ब) (4) (अ), (ब) व (क)

---

54. भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदान्वये महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 तयार केले आहेत ?

(1) अनुच्छेद 306 (2) अनुच्छेद 307 (3) अनुच्छेद 308 (4) अनुच्छेद 309

---

55. सावधी नियुक्ती म्हणजे काय ?

(1) शासकीय कर्मचाऱ्याच्या पुनर्नियुक्तीचे पद

(2) शासकीय कर्मचाऱ्याच्या प्रतिनियुक्तीचे पद

(3) शासकीय कर्मचाऱ्याची पुनर्नियुक्ती न होता त्याला मर्यादित कालावधीपेक्षा अधिक काळ जे पद धारण करता येणार नाही असे स्थायी पद

(4) वरीलपैकी एकही नांही

---

56. खालीलपैकी **चुकीचे** विधान कोणते ?

(1) सेवा पुस्तकाची मूळ प्रत सुरक्षिततेसाठी प्रथम नियुक्तीच्या कार्यालयात ठेवून दुय्यम प्रत बदलीच्या कार्यालयात पाठवावयाची असते.

(2) सेवा पुस्तकाची दुसरी प्रत कर्मचाऱ्यास देताना त्यातील नोंदी पडताळून पाहण्याबाबत त्यास स्पष्ट सांगावयाचे आहे.

(3) कर्मचाऱ्याची बदली ज्या ज्या कार्यालयात होईल त्या त्या कार्यालयात सेवा पुस्तकाची मूळ प्रत पाठवावी.

(4) सेवा पुस्तकाची मूळ प्रत कार्यालय प्रमुखाच्या अभिरक्षेत ठेवावी.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

57. एखाद्या क्षेत्रातील खर्चिक राहणीमान किंवा रोगट परिस्थिती लक्षात घेऊन मंजूर केलेल्या भत्त्याला काय म्हणतात?

(1) पूरक भत्ता (2) स्थानिक निधी (3) स्थानिक भत्ता (4) विशेष भत्ता

---

58. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 नुसार खालील नमूद कोणत्या/कोणकोणत्या कारणासाठी शासकीय कर्मचाऱ्याची कमी वेतन असलेल्या पदावर बदली अनुज्ञेय आहे?

(1) अकार्यक्षमता किंवा गैरवर्तणूक

(2) त्याने केलेली लेखी विनंती

(3) त्याचा ज्या पदावर धारणाधिकार आहे, ते पद नष्ट होण्याची शक्यता

(4) वरील सर्व कारणासाठी अनुज्ञेय आहे

---

59. शासकीय कर्मचाऱ्याने लावलेल्या शोधाबद्दल, पेटंट मिळविण्याबाबत खालीलपैकी कोणते विधान **अचूक** आहे?

(1) तांत्रिक संशोधनाचे कर्तव्य पार पाडणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याने पेटंटसाठी अर्ज केला.

(2) वैज्ञानिक सेवेचे काम अंतर्भूत असलेल्या संस्थेच्या अधिकाऱ्याने, त्याने लावलेल्या शोधाबद्दल पेटंट मिळविले.

(3) शासकीय कर्मचाऱ्याने, त्याने लावलेल्या शोधाची माहिती अन्य व्यक्तीला देऊन प्रसिद्ध केली.

(4) संशोधन संस्थेचा प्रमुख असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याने तात्पुरत्या विनिर्देशपत्रासह पेटंटसाठी अर्ज केला.

---

60. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 नुसार कर्तव्यामध्ये खालीलपैकी कोणत्या बाबी समाविष्ठ असतील?

(अ) परिवीक्षाधीन म्हणून केलेली सेवा

(ब) पदग्रहण अवधी

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) (अ) व (ब) दोन्ही (4) (अ) व (ब) दोन्ही नाहीत

---

61. एखाद्या कर्मचाऱ्यास स्वाक्षरी करता येत नसेल तर त्याच्या बोटांचे ठसे सेवा पुस्तकातील कोणत्या स्तंभात घेतले जातात?

(1) सेवापुस्तकाचे शेवटचे पृष्ठ (2) स्वतंत्र चिठ्ठीवर

(3) वैयक्तिक ओळख चिन्हे (4) यापैकी नाही

---



Teachingninja.in

62. सेवा पुस्तकाची वार्षिक पडताळणी कोणी व केव्हा करावी?

(1) वेतन पडताळणी पथकाकडून प्रत्येक वर्षी दिलेल्या कालावधीत पडताळणी करावी.

(2) प्रत्येक वर्षाच्या एप्रिल महिन्यात लेखाधिकारी यांनी पडताळणी करावी.

(3) प्रत्येक वर्षाच्या मे महिन्यामध्ये कार्यालय प्रमुखाने पडताळणी करावी.

(4) वेतनवाढ लागू केल्यानंतर विभाग प्रमुखाने पडताळणी करावी.

---

63. खालीलपैकी कोणते विधान **अयोग्य** आहे?

(अ) वित्त विभागाशी विचारविनिमय केल्याखेरीज म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियमांखालील कोणत्याही अधिकाराचे प्रत्यायोजन करता येणार नाही.

(ब) सेवापुस्तकामध्ये, वैयक्तिक चारित्र्य प्रमाणपत्रांची नोंद, घेण्यासाठी विभाग प्रमुखांच्या आदेशाची आवश्यकता नाही.

(क) शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याचे सेवापुस्तक त्याला परत करावे.

(ड) शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवा अभिलेखातील उतारे, विमा कंपन्यांना पुरविण्यासंदर्भात विभाग प्रमुखांचा स्वेच्छा निर्णय असेल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील (अ) व (ब)
(2) वरील (क) व (ड)
(3) वरील (अ), (ब), (क)
(4) वरील (ब) व (क)

---

64. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 चे नियम 9 (37) नुसार निवृत्ती वेतनामध्ये __________ चा समावेश होतो.

(1) सेवा निवृत्ती वेतन
(2) रुग्णता निवृत्ती वेतन
(3) कुटुंब निवृत्ती वेतन
(4) उपदान

---

65. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 च्या परिशिष्ट – दोन मध्ये म.ना.से. नियमांच्या प्रयोजनासाठी पुढीलपैकी कोणत्या प्राधिकाऱ्यांची यादी देण्यात आली आहे?

(1) शासन प्रमुख
(2) विभाग प्रमुख
(3) कार्यालय प्रमुख
(4) कार्यासन प्रमुख

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

66. शासकीय सेवेसाठी पात्रताविषयक वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये खालील बाबी समाविष्ट असतात –

(अ) शासकीय कर्मचाऱ्याचे नाव

(ब) शासकीय कर्मचाऱ्याचे पद

(क) शासकीय कर्मचाऱ्यास आधी झालेले आजार

(ड) शासकीय कर्मचाऱ्याची ओळखचिन्हे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब), (क) व (ड) (2) (अ), (ब) व (ड)

(3) (अ), (ब) व (क) (4) (अ), (क) व (ड)

---

67. योग्य पर्याय निवडा –

स्वतंत्र घटक म्हणून केलेली एखाद्या सेवेतील किंवा सेवेच्या भागातील 'कायम' त्याचप्रमाणे वेळोवेळी मंजूर केलेली 'अस्थायी पदे' यांचा समूह म्हणजे –

(1) सावधी नियुक्ती पद (2) गट

(3) परिवीक्षा पद (4) संवर्ग

---

68. शासकीय कर्मचाऱ्यास नियुक्ती झालेल्या ठिकाणापर्यंत प्रवास करण्यासाठी लागलेला कालावधी म्हणजे –

(1) प्रवास कालावधी (2) कर्तव्य कालावधी

(3) पदग्रहण अवधी (4) यापैकी नाही

---

69. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 नुसार पोलीस शिपाई यांच्या बाबतीत सेवापटामध्ये खालीलपैकी कोणता तपशील नमूद नसतो ?

(1) युनिटचे नाव (2) मातृभाषा (3) वजन (4) उंची

---

70. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियमाचे अर्थ विवरण करण्याचा हक्क खालीलपैकी कोणाला आहे ?

(1) वित्त विभाग (2) सामान्य प्रशासन विभाग

(3) उच्च न्यायालय (4) वरील सर्व

---



Teachingninja.in

71. राजपत्रित व अराजपत्रित अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या बाबतीत वैद्यकीय प्रमाणपत्र प्रस्तुत करण्याची खालीलपैकी कोणती कार्यपद्धती आहे?

(अ) राजपत्रित शासकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत ज्या सक्षम अधिकाऱ्याला वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले असेल तर त्या प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र पहिल्या वेतनदेयका सोबत जोडावे.

(ब) अराजपत्रित शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत आहरण व संवितरण अधिकाऱ्याने असे प्रमाणपत्र संबंधित कर्मचाऱ्याच्या पहिल्या वेतनदेयका सोबत प्रस्तुत करावे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) (अ) व (ब)

(3) फक्त (ब) (4) प्रमाणपत्र प्रस्तुत करण्याची आवश्यकता नाही

---

72. शासकीय सेवेत प्रवेश केल्यापासुन किती कालावधीपर्यंत सेवापुस्तकात नोंदविलेल्या जन्मतारखेमध्ये फेरबदल करण्यासाठी कर्मचाऱ्याने केलेल्या अर्जाचा सामान्यत: विचार केला जातो?

(1) 1 वर्षाच्या आत (2) 2 वर्षाच्या आत

(3) 5 वर्षाच्या आत (4) एकदा नोंदविलेल्या जन्मतारखेमध्ये बदल करता येत नाही.

---

73. शासकीय कर्मचाऱ्याचा सेवेचा दैनंदिन कालावधी किती असतो?

(1) कार्यालयीन कामकाजाची वेळ (2) 24 तास

(3) बारा तास (4) आठ तास

---

74. अराजपत्रित शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकामध्ये स्वीयेतर सेवेतील नोंदी खालीलपैकी कोणता अधिकारी करील?

(1) लेखा परीक्षा अधिकारी (2) कार्यालय प्रमुख

(3) राजपत्रित अधिकारी (4) तपासणी अधिकारी

---

75. केंद्र शासन अथवा राज्य शासनाला किंवा त्यांच्या वतीने मिळालेला इतर सर्व प्रकारचा सरकारी पैसा म्हणजे __________ होतो.

(1) एकत्रित निधी (2) भारताचा किंवा राज्याचा लोकलेखा

(3) राज्याचा आकस्मिक निधी (4) राज्याचा भांडवली निधी

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

## विभाग "ब"

76. राप्रौशि 1197 / प्र. क्र. 15 / का. 6 या फाईल क्रमांकामधील, खालील विधाने विचारात घ्यावीत.

(अ) राप्रौशि – हे मुख्यशिर्ष दर्शविते

(ब) 11 – हे उपशिर्ष दर्शविते

(क) 97 – हे फाईलीचे वर्ष दर्शविते

(ड) का. 6 – हे संबंधित कार्यासनाचा क्रमांक दर्शविते

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व विधाने चुकीची आहेत

(2) (अ), (ब) व (क) बरोबर आहेत

(3) सर्व विधाने बरोबर आहेत

(4) (अ), (क) व (ड) बरोबर आहेत

---

77. अवर सचिवाने आपल्या नियंत्रणाखालील प्रत्येक कार्यासनाचे निरीक्षण किती कालावधीत करावे ?

(1) दर तीन महिन्यांनी (2) दर सहा महिन्यांनी (3) वर्षातून एकदा (4) महिन्यातून एकदा

---

78. कार्यासनात आलेल्या व मूळ विभागाकडे परत पाठवायच्या अनौपचारिक संदर्भाच्या स्थलांतराची नोंद ________ या नोंदवहीत घेण्यात येईल.

(1) अनौपचारिक संदर्भ दैनंदिनी

(2) प्रकरण नोंदवही

(3) आवक दैनंदिनी

(4) यापैकी नाही

---

79. अभिलेख्याच्या वर्गीकरणासंदर्भात **योग्य** जोड्या जुळवा.

| **गट 'अ' (वर्ग)** | **गट 'ब' (कालावधी)** |
|---|---|
| (अ) 'अ' वर्ग | (i) 5 वर्षे |
| (ब) 'ब' वर्ग | (ii) 1 वर्ष |
| (क) 'क' वर्ग | (iii) 30 वर्षे |
| (ड) 'ड' वर्ग | (iv) अनिश्चित कालावधी |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (4) | (ii) | (iii) | (iv) | (i) |

---



Teachingninja.in

80. फाईल तयार करताना टिप्पणी विभाग व पत्रव्यवहार विभाग यांच्यामध्ये एक __________ घालावे.

(1) निर्देशपत्र (2) पृथकपत्र (3) पताका (4) वरीलपैकी एकही नाही

---

81. कार्यविवरणपत्रामध्ये आवकपत्रांची नोंद घेताना, टिप्पणी सहायक,

(अ) टपालाचे अवलोकन केल्यानंतर लगेच त्या आवकपत्रांची कार्यविवरणपत्रामध्ये नोंद घेईल.

(ब) इतर कार्यासनांनी सादर केलेली 'मार्फत' प्रकरणे आवकपत्र समजेल.

(क) लागोपाठच्या ओळींमध्ये कोरी जागा न सोडता नोंदी करेल.

(ड) आवकपत्रावरील प्राथम्यक्रमाच्या चिन्हांकनाची कार्यविवरणपत्रात नोंद घेणार नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) आणि (क) बरोबर (2) (अ) आणि (क) बरोबर

(3) (अ), (क) आणि (ड) बरोबर (4) वरील सर्व बरोबर

---

82. एखाद्या सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना अंतर्गतरित्या निर्णय कळविण्यासाठी पत्राच्या कोणत्या नमून्याचा वापर करतात?

(1) अर्धशासकीय पत्र (2) कार्यालयीन आदेश (3) परिपत्रक (4) पृष्ठांकन

---

83. खालील विधाने विचारात घ्यावीत.

(अ) कार्यासनातून निर्गमित केल्या जाणाऱ्या प्रत्येक महत्वाच्या आदेशाची एक प्रत 'निवड फाईल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्वतंत्र नस्तीत ठेवली जाते.

(ब) सारसंग्रहामध्ये निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांच्या सारसंग्रह चिठ्ठयांचा समावेश केलेला असतो.

(क) आदेशाच्या, पत्रांच्या किंवा इतर कागदांच्या वाटपासाठी किंवा फिरविण्यासाठी इ. आवश्यक असलेल्या प्रतीपेक्षा अधिकच्या प्रती जादा प्रती म्हणून जतन करण्यात येतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील सर्व विधाने चुकीची आहेत. (2) केवळ विधान (अ) व विधान (ब) बरोबर आहेत.

(3) सर्व विधाने बरोबर आहेत. (4) केवळ विधान (अ) बरोबर आहे.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

84. खालीलपैकी कोणत्या पत्रव्यवहारामध्ये शेवटी 'महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने' असे नमूद करण्यात येते?

(अ) ज्ञापन (ब) परिपत्रक (क) कार्यालयीन आदेश

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) व (ब)
(2) फक्त (ब) व (क)
(3) वरील सर्व
(4) यापैकी कोणतेही नाही

---

85. पुढीलपैकी कोणती प्रकरणे शक्यतो त्याच दिवशी किंवा जास्तीत जास्त म्हणजे दुसऱ्या दिवशी सकाळी सादर करणे आवश्यक आहे?

(1) तात्काळ प्रकरणे (2) तातडीची प्रकरणे (3) टंचाई प्राथम्य प्रकरणे (4) निकडीची प्रकरणे

---

86. खालीलपैकी कोणते प्रस्ताव मान्यतेसाठी मंत्रीपरिषदेपुढे ठेवणे आवश्यक आहे?

(अ) राज्याच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारा परंतु वित्तमंत्री यांनी संमती न दिलेला प्रस्ताव
(ब) लोकसेवा आयोगाच्या शिफारशीशी विसंगत असलेले नेमणूकीसाठीचे प्रस्ताव
(क) राज्याच्या विधानमंडळाची सत्रसमाप्ती करण्याचे प्रस्ताव
(ड) राज्याची विधानसभा बरखास्त करण्याचे प्रस्ताव

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील सर्व (2) एकही नाही (3) (अ), (ब) व (क) (4) (अ) व (ब)

---

87. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005 मधील तरतुदीनुसार,

(अ) शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या सामान्यपणे वर्षातून एकदाच एप्रिल किंवा मे महिन्यात करण्यात याव्यात.
(ब) सामान्यपणे शासकीय कर्मचाऱ्याने पदस्थापनेचा पदावधी पूर्ण केल्याशिवाय त्याची बदली करू नये.
(क) विशेष कारणामुळे बदली करणे आवश्यक आहे अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटल्यास लेखी कारणे नमूद करून लगतच्या वरिष्ठ प्राधिकाऱ्याच्या पूर्व मान्यतेने बदली पदावधी पूर्ण होण्यापूर्वी ही करता येईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व विधाने चुकीची आहेत.
(2) सर्व विधाने बरोबर आहेत.
(3) विधाने (अ) व (ब) बरोबर आहेत.
(4) केवळ विधान (क) बरोबर आहे.

---



Teachingninja.in

88. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या महाराजस्व अभियानांतर्गत एक महिन्यावर प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढण्याकरिता महसूल मंडळाच्या मुख्यालयी फेरफार अदालत खालीलपैकी कोणत्या दिवशी आयोजित करण्यात येते ?

(1) प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी
(2) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी
(3) प्रत्येक महिन्याच्या पहिल्या बुधवारी
(4) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी

---

89. आवकपत्रे जेव्हा नित्याचीच असतील किंवा त्यावर कार्यवाही करण्याजोगी नसेल तर __________ वापरले नाही तरी चालेल.

(1) पृथकपत्र
(2) निर्देशपत्र
(3) आवकपत्र
(4) पृष्टीपत्र

---

90. न्युक्लिअस बजेट योजना राज्य शासनाच्या कोणत्या विभागांतर्गत राबविण्यात येते ?

(1) वित्त विभाग
(2) महसूल व वन विभाग
(3) नियोजन विभाग
(4) आदिवासी विकास विभाग

---

91. प्रश्न सभापतींनी स्वीकृत न करणे किंवा सुधारणा करणे याबाबत महाराष्ट्र विधानपरिषद नियम क्र.__________ मध्ये तरतूद आहे.

(1) 70
(2) 69
(3) 68
(4) 66

---

92. विधानपरिषदेच्या बैठकीच्या शेवटी पुरेशा सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा करण्यासाठी कोणत्या दिवशी अर्धा तास नेमून दिलेला असतो.

(अ) सोमवार, मंगळवार
(ब) बुधवार, गुरुवार
(क) गुरुवार, शुक्रवार
(ड) बुधवार, शुक्रवार

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब)
(2) (क) व (ड)
(3) (अ) व (क)
(4) वरीलपैकी सर्व

---

93. महाराष्ट्र विधानसभा नियम क्र. 86 अन्वये अल्पावधी सूचना अधिवेशनाच्या किंवा स्थगित केलेल्या अधिवेशनाच्या प्रारंभापूर्वी__________ दिवसांच्या आधीची नसेल.

(1) 2
(2) 4
(3) 5
(4) 7

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

94. विधानसभा सदस्यास अर्धा तास चर्चेची लेखी नोटीस किमान किती दिवस अगोदर द्यावी लागते?

(1) सात दिवस (2) दोन दिवस (3) पाच दिवस (4) तीन दिवस

95. महाराष्ट्र विधानपरिषद नियम क्र. 102 नुसार ज्या सदस्यांनी ठरावासाठी पूर्ण __________ दिवसांची सूचना दिलेली असेल अशा सर्व सदस्यांची नांवे, त्यांचा परस्परातील अग्रक्रम ठरविण्यासाठी बॅलटमध्ये समाविष्ट करण्यात येतील.

(1) 12 (2) 14 (3) 15 (4) 13

96. राज्यपाल पदाच्या नियुक्तीसाठी वयाची किमान मर्यादा किती आहे?

(1) 25 वर्षे (2) 18 वर्षे (3) 35 वर्षे (4) 21 वर्षे

97. संविधानानुसार

(अ) राज्य विधानसभेच्या सदस्यत्वासाठी अर्हता – ती व्यक्ती किमान 30 वर्ष वयाची असली पाहिजे.

(ब) राज्य विधानपरिषदेच्या सदस्यत्वासाठी अर्हता – ती व्यक्ती किमान 25 वर्ष वयाची असली पाहिजे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) दोन्ही बरोबर (2) (अ) व (ब) दोन्ही चुकीचे

(3) (अ) बरोबर असून (ब) चुकीचे आहे (4) (अ) चुकीचे असून (ब) बरोबर आहे

98. भारतीय संविधानानुसार कोणत्याही राज्याच्या मंत्रिपरिषदेत मुख्यमंत्री तसेच मंत्री यांची एकूण संख्या त्या राज्याच्या विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या __________ पेक्षा अधिक असणार नाही परंतु एकूण संख्या __________ पेक्षा कमी असणार नाही. (रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा)

(1) 10%, 12 (2) 15%, 12 (3) 20%, 15 (4) 25%, 15

99. राज्यविधान मंडळाचा सदस्य नसला तरी सभागृहात भाषण करण्याचा व कामकाजात भाग घेण्याचा हक्क कोणाला आहे?

(1) मुख्यसचिव (2) कॅबिनेट मंत्री

(3) राज्याचा महाधिवक्ता (4) महालेखापाल

100. संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदानुसार राज्यपालास कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरलेल्या कोणत्याही व्यक्तीला शिक्षेस स्थगिती किंवा सूट देण्याचा अधिकार आहे?

(1) अनुच्छेद 160 (2) अनुच्छेद 161 (3) अनुच्छेद 162 (4) अनुच्छेद 163

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

## विभाग "क"

76. खालीलपैकी कोणते/ती विधान/ने **सत्य** आहे/त?

**विधान (अ) :** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद – 322 नुसार राज्य लोकसेवा आयोगाकडे स्थानिक प्राधिकरणाच्या सेवांबाबतची अतिरिक्त कार्ये सोपविण्यात येतात.

**विधान (ब) :** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद – 317 नुसार संघ लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य यांना राष्ट्रपती पदावरून दूर करू शकतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त **विधान (अ)** सत्य आहे.
(2) फक्त **विधान (ब)** सत्य आहे.
(3) **विधाने (अ)** आणि **(ब)** सत्य आहेत.
(4) **विधाने (अ)** आणि **(ब)** असत्य आहेत.

---

77. भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदानुसार संघ लोकसेवा आयोगाला एखाद्या राज्याच्या राज्यपालाने विनंती केल्यास राष्ट्रपतींच्या मान्यतेने त्या राज्याच्या कामाची गरज भागविता येते?

(1) अनुच्छेद 317 चा खंड 3
(2) अनुच्छेद 319 (ग)
(3) अनुच्छेद 315 चा खंड 4
(4) अनुच्छेद 318 (क)

---

78. खालील जोड्या जुळवा :

| **अनुच्छेद** | | **तरतुदी** |
|---|---|---|
| (अ) अनुच्छेद – 316 | (i) | आयोगाचा सदस्य आणि कर्मचारीवर्ग यांच्या सेवाशर्तींबाबत विनियम करण्याचा अधिकार |
| (ब) अनुच्छेद – 318 | (ii) | आयोगाच्या सदस्यांनी सदस्यत्व समाप्त झाल्यावर पदे धारण करण्याबाबत मनाई |
| (क) अनुच्छेद – 319 | (iii) | सदस्यांची नियुक्ती व पदावधी |
| (ड) अनुच्छेद – 322 | (iv) | लोकसेवा आयोगाचा खर्च |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (i) | (iii) | (iv) | (ii) |

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

79. जर राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष अनुपस्थित असल्यामुळे त्यांच्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ असतील, तर ते रुजू होईपर्यंत त्या रिक्त राहणाऱ्या पदावर आयोगाच्या अन्य सदस्यांपैकी एकाची नियुक्ती कोणाकडून करण्यात येते?

(1) शासनाचे मुख्य सचिव
(2) राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष
(3) मुख्यमंत्री
(4) राज्यपाल

---

80. लोकसेवा आयोगाच्या कर्मचारी वर्गाच्या सदस्यांची संख्या आणि त्यांच्या सेवाशर्ती नियम याबाबतचे उपबंध खालीलपैकी कशाच्या आधारे विहित करण्यात येतात?

(1) आयोगाची कार्य नियमावली
(2) संविधानाच्या अनुच्छेद 320 अन्वये
(3) आस्थापना शाखेने निर्गमीत केलेल्या स्थायी आदेशान्वये
(4) संविधानाच्या अनुच्छेद 318 अन्वये

---

81. आयोगामार्फत स्पर्धा परीक्षेने भरण्यात येणाऱ्या बहुसंवर्गीय पदभरतीकरिता प्रतीक्षायादी किती कालावधीकरिता ठेवण्यात येते?

(1) निकालाच्या दिनांकापासून एक वर्ष किंवा पुढील जाहिरातीच्या दिनांकापर्यंत
(2) निकालाच्या दिनांकापासून एक वर्ष किंवा पुढील परीक्षेच्या निकालाच्या दिनांकापर्यंत
(3) निकालाच्या दिनांकापासून दोन वर्षे किंवा पुढील परीक्षेच्या निकालाच्या दिनांकापर्यंत
(4) बहुसंवर्गीय पदभरतीकरिता प्रतिक्षायादी ठेवण्यात येत नाही

---

82. आयोगामार्फत आयोजित वस्तुनिष्ठ बहुपर्यायी चाळणी परीक्षांकरिता नकारात्मक गुणांच्या अंमलबजावणीची कार्यपद्धत कशा प्रकारे दिनांक 7 सप्टेंबर 2020 च्या स्थायी आदेशामध्ये विहित केली आहे?

(अ) एखाद्या प्रश्नांची एकापेक्षा अधिक उत्तरे दिल्यास त्या प्रश्नाच्या उत्तराकरिता नकारात्मक गुणांची पध्दत लागू नाही.
(ब) प्रत्येक चुकीच्या उत्तराकरिता 25% गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात यावे.
(क) एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच ठेवून त्या आधारे पुढील कार्यवाही करावी.
(ड) एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तर ती पूर्णांकात करून घ्यावी व त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (ब) व (क)
(2) (ब) व (ड)
(3) (अ), (ब) व (ड)
(4) चाळणी परीक्षांना नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

---



Teachingninja.in

83. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (सदस्य व कर्मचारी) (सेवेच्या शर्ती) विनियम, 1971 संदर्भात खालीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(अ) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद - 319 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून हे विनियम तयार केले आहेत.

(ब) मुंबई लोकसेवा आयोग (सेवेच्या शर्ती) विनियम, 1958 अधिक्रमित करून हे विनियम तयार केले आहेत.

(क) दि. 28 जानेवारी 1971 रोजी हे विनियम अधिसूचित झाले आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त विधाने (अ) व (ब) बरोबर आहेत.

(2) फक्त विधाने (ब) व (क) बरोबर आहेत.

(3) विधाने (अ), (ब) व (क) तिन्ही बरोबर आहेत.

(4) विधाने (अ), (ब) व (क) तिन्ही चूक आहेत.

---

84. स्थायी आदेश क्र. 10/2021 दि. 1 सप्टेंबर 2021 द्वारे आयोगाच्या कार्यालयातील विविध विभागाच्या पुनर्रचना व कामाच्या फेरवाटपाबाबत खालीलप्रमाणे विभाग व कक्षाची संरचना करण्यात आली आहे.

(1) विभाग - 13 कक्ष - 32
(2) विभाग - 12 कक्ष - 30
(3) विभाग - 11 कक्ष - 28
(4) यापैकी नाही

---

85. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या परिक्षेचा अंतिम निकाल तयार करताना खालीलपैकी कोणत्या बाबी विचारात घेण्यात येतात ?

(अ) आरक्षण

(ब) मुख्य परीक्षा व मुलाखतीचे गुण

(क) पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखतीचे गुण

(ड) पदव्युत्तर पदवीचे गुण व वकिलीचा अनुभव

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) व (ब)
(2) फक्त (अ), (ब), (ड)
(3) फक्त (ब)
(4) फक्त (अ), (क), (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

86. म.लो.आ. (सदस्य व कर्मचारी) (सेवेच्या शर्ती) विनियम, 1971 मधील भाग 8 – लिपिकवर्गीय आस्थापना यानुसार, लिपिकवर्गीय आस्थापनेमध्ये खालीलपैकी कोणाचा समावेश होतो ?

(अ) लिपिक व टंकलेखक (ब) लेखापाल (क) लघुलेखक

(ड) सहायक (इ) अधिक्षक (ई) अवर सचिव

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब), (क) (2) (अ), (ब), (क), (ड)

(3) (अ), (ब), (क), (ड), (इ) (4) वरील सर्व

---

87. खालील विधानांचे परीक्षण करून **योग्य** पर्याय निवडा –

**विधान ( अ ) :** आयोगाच्या सचिवाची नेमणूक राज्यपालांकडून मुख्यमंत्र्याशी विचारविनिमय करून करण्यात येते.

**विधान ( ब ) :** सचिवाचा पदावधी मुख्यमंत्र्याकडून ठरवण्यात येईल अशा अधिक कालावधीकरिता वाढवला जाऊ शकेल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त विधान (अ) बरोबर (2) फक्त विधान (ब) बरोबर

(3) (अ) व (ब) दोन्ही विधाने बरोबर आहेत (4) (अ) व (ब) दोन्ही विधाने चूक आहेत

---

88. आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षांमधून मुलाखतीकरिता बोलविण्यात येणाऱ्या उमेदवारांसाठी पर्सेंटाईलाचे प्रमाण काय आहे ?

(1) अमागास – 45%, मागास प्रवर्ग – 40%, खेळाडू/मा.सै./दिव्यांग- 30%

(2) अमागास – 35%, मागास प्रवर्ग व अनाथ प्रवर्ग =30%, खेळाडू/मा.सै./दिव्यांग- 20%

(3) अमागास – 35%, मागास प्रवर्ग – 20%, खेळाडू/मा.सै./दिव्यांग- 15%

(4) वरीलपैकी एकही नाही

---



Teachingninja.in

89. म.लो.आ. (सदस्य व कर्मचारी) (सेवेच्या शर्ती) विनियम, 1971 नुसार "सदस्य" या व्याख्येमध्ये कोणाचा समावेश होतो?

(1) फक्त आयोगाचे सदस्य
(2) फक्त आयोगाचे अध्यक्ष
(3) (1) व (2) दोन्ही
(4) यापैकी नाही

---

90. आयोगाच्या सदस्यांना कर्तव्यार्थ विमानाने प्रवास करावयाचा असल्यास कोणाची मंजूरी घ्यावी लागते?

(1) मा. अध्यक्ष
(2) मुख्य सचिव
(3) राज्य शासन
(4) यापैकी कोणाचीही नाही

---

91. आयोगातर्फे ज्या पदांकरिता शारीरिक चाचणी घेतली जाते त्या पदांच्या शारीरिक चाचणीकरिता विज्ञापित पदांच्या किती पट उमेदवार बोलविण्यात येतात?

(1) 10 पट
(2) 08 पट
(3) 04 पट
(4) 03 पट

---

92. **अचूक** पर्याय निवडा –

**विधान (अ) :** आयोगाची कार्यनियमावली नियम – 15 नुसार आयोगाची बैठक दोन महिन्यात एकदातरी आयोजित करणे आवश्यक आहे.

**विधान (ब) :** आयोगाच्या कार्यनियमावलीनुसार लेखी परीक्षेमधून मुलाखतीकरिता बोलाविण्यात येणाऱ्या अनाथ प्रवर्गातील उमेदवारांसाठी शतमत पर्सेंटाइलचे प्रमाण 20% आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त विधान (अ) बरोबर
(2) फक्त विधान (ब) बरोबर
(3) दोन्ही विधाने बरोबर आहेत
(4) दोन्ही विधाने चूक आहेत

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

93. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा संविधानिक दर्जा विचारात घेता शासनाकडून आयोगाबरोबर पत्रव्यवहार करताना –

**विधान ( अ ) :** सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या नावे किमान उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या स्तरावरून पत्रव्यवहार केला जातो.

**विधान ( ब ) :** प्रशासकीय विभाग आयोगासमोर विचारार्थ असलेल्या किंवा येण्याची शक्यता असलेल्या त्यांच्या सेवाविषयक प्रश्नासंबंधी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष किंवा सदस्यांबरोबर थेट पत्रव्यवहार करू शकतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त विधान (अ) बरोबर (2) फक्त विधान (ब) बरोबर

(3) दोन्ही विधाने बरोबर (4) दोन्ही विधाने चूक

---

94. अपवादात्मक परिस्थितीमध्ये गुणांची सीमारेषा (Cut-off line of Marks) पदांच्या 20 पट उमेदवार उपलब्ध होईपर्यंत निश्चित करण्याची तरतूद आयोगाच्या कार्यनियमावलीमध्ये खालीलपैकी कोणत्या दिनांकाच्या सुधारणेद्वारे करण्यात आली आहे?

(1) 16 मे 2014 (2) 15 मे 2015 (3) 28 डिसेंबर 2016 (4) 13 जानेवारी 2021

---

95. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची कार्यनियमावली (Rules of Procedure) भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदानुसार प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारान्वये तयार करण्यात आली आहे?

(1) अनुच्छेद 309 (2) अनुच्छेद 315 (3) अनुच्छेद 320 (4) अनुच्छेद 323

---

96. खालील विधाने विचारात घ्या :

(अ) वृत्तपत्रांचे पॅनल तयार करण्यासंबंधिची धारिका दर तीन वर्षांनी नष्ट करण्यात यावी.

(ब) पोलीस उपनिरीक्षक शारीरिक पात्रता तपासलेली विवरणपत्रे परीक्षेच्या अंतिम निकालानंतर दोन वर्षांनी नष्ट करावीत.

(क) वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या शिल्लक उत्तरपत्रिका परीक्षेच्या दिनांकापासून एक वर्षाने नष्ट कराव्यात.

(ड) पारंपारिक स्वरूपाच्या प्रश्नपत्रिकांची हस्तलिखित नमुना उत्तरे व त्यासंबंधिची उमेदवारांची अभिवेदने अंतिम निकालानंतर तीन वर्षांनी नष्ट करावीत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (क) बरोबर (ब), (ड) चूक (2) (ब), (ड) बरोबर (अ), (क) चूक

(3) सर्व विधाने बरोबर (4) सर्व विधाने चूक

---



Teachingninja.in

97. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वार्षिक अहवालातील परिशिष्ट इ मध्ये कोणत्या माहितीचा समावेश असतो ?

(1) आयोगाद्वारे सल्ला देण्यात आलेली सेवा प्रवेश नियम विषयक प्रकरणे.

(2) बृहन्मुंबई महानगरपालिका आणि बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम यांच्या अखत्यारितील पदांसाठी मुलाखतीद्वारे सरळ सेवा भरती प्रकरणाचा तपशील.

(3) राज्य शासनातील विविध पदांसाठी स्पर्धा परीक्षेद्वारे आयोगाने केलेल्या शिफारसी.

(4) आयोगाच्या कार्यालयातील/आस्थापनेवरील राजपत्रित व अराजपत्रित पदांच्या पदसंख्येबाबत तपशील.

---

98. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय या सरळसेवेच्या पदाची जाहिरात दि. 21 ऑक्टोबर 2022 रोजी प्रसिद्ध करण्यात आली. जाहिरातीच्या अनुषंगाने खालीलपैकी कोणती विधाने **सत्य** आहेत ?

**विधान ( अ ) :** अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

**विधान ( ब ) :** अनुभवाच्या कालावधीची गणना अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास करण्यात येईल.

**विधान ( क ) :** सदर जाहिरातीस अनुसरून सदर पदासाठी वयोमर्यादेची गणना 1 फेब्रुवारी 2023 रोजी गणण्यात येईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त विधाने (अ) व (ब) सत्य आहेत.

(2) विधाने (अ), (ब) व (क) तिन्ही विधाने सत्य आहेत.

(3) फक्त विधाने (अ) व (क) सत्य आहेत.

(4) फक्त विधाने (ब) व (क) सत्य आहेत.

---

99. दि. 24/06/2022 रोजीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार राज्यसेवा मुख्य परीक्षेबाबतीतील खालीलपैकी **योग्य** विधान/विधाने कोणते/कोणती आहे/आहेत ?

(अ) राज्यसेवा मुख्य परीक्षा एकूण 2050 गुणांची घेण्यात येईल.

(ब) वैकल्पिक विषयांची एकूण संख्या 27 आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ)

(2) फक्त (ब)

(3) (अ) व (ब) दोन्हीही

(4) वरीलपैकी एकही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

100. खालीलपैकी **अचूक** पर्याय निवडा -

(अ) महिला आरक्षण हे सामाजिक प्रवर्गातील कप्पीकृत आरक्षण आहे.

(ब) माजी सैनिक आरक्षण हे सामाजिक प्रवर्गातील कप्पीकृत नसलेले आरक्षण आहे.

(क) दिव्यांग आरक्षण हे सामाजिक प्रवर्गातील कप्पीकृत नसलेले आरक्षण आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त विधान (अ) व (ब) बरोबर
(2) फक्त विधान (अ) व (क) बरोबर
(3) फक्त विधान (ब) व (क) बरोबर
(4) तीन्ही विधाने (अ), (ब) व (क) बरोबर

---

- o 0 o -

Teachingninja.in



Teachingninja.in

## सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम–82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग–1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलतः प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर–क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर–क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

SEAL

Teachingninja.in